भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.३३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०५/२०१७

**१) संगनमत करुन घरातील समोरील दाराचा हॅन्डल सरकवुन आत प्रवेश करुन लाथाबुक्यांनी मारपीट करुन जबरीने अंगावरील सोन्याचे दागिण्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १४/०५/२०१७ चे ०२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे राहत्या घराचे छपरीत सुरू असलेले लाईट बंद करून घरातील समोरील दाराचा हॅन्डल सरकवुन आत प्रवेश करून दि १४/०५/२०१७ ला ०२०० वा. दरम्यान फिर्यादीला जाग आल्याने तेथील लाईट बंद का झाला म्हणून छपरीत गेली असता एक अनोळखी इसम फिर्यादीचे जवळ येवुन फिर्यादीस पकडुन खाली पाडुन तीला लाथाबुक्क्यांनी मारपीट करून हात, पाय, तोंड दाबुन तिच्या गळयातील काळया मणीचे गरसुलीतील २० सोन्याचे मनी असलेली नाकातील सोन्याचा खळा काढुन तसेच छपरात झोपलेली फिर्यादीची आई हीस खाटेवरून दुस—या अनोळखी आरोपी इसमाने ओढुन तिच्या गळयातील १ सोन्याची एकदानी १२ ग्रॅम, ०१ नाकातील सोन्याचा खळा असा एकुण २९,०००/—रू चा माल आरोपीतांनी संगनमन करून जबरी चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम ३९२,३९४,४५७,४५८,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०५/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस 'तु माझ्या पत्नीला, मुलाला सुनेला शिकवतेस' त्यामुळे माझा संसार बिघडला असे बोलुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने फिर्यादी सौ. दुल्हनबाई छगन शेंडे वय ४० वर्ष, रा. महालगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) घराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सोन्या व चांदीचे साहित्याची चोरी . :—**

दिनांक १०/०५/२०१७ ते ११/०५/२०१७ चे. रात्र. दरम्यान यातील फिर्यादी हे घराला ताला लावुन कुटुबांसह स्वगावी गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन स्टोअर रुम मध्ये ठेवलेल्या लोखंडी आलमारीतील १ सोन्याचा सिक्का २.५ ग्रॅम, चांदीचे पुजेचे पाऊल ०४ ग्रॅम, १ काचेच्या भरणीत असलेले चिल्लर सिक्के अंदाजे ३००/—रु. असा एकुण ५,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने आज रोजी फिर्यादी शंकर ज्ञानेश्वर नरवाडे वय ३६ वर्ष, रा. ह. मु. न्यु मातृस्मृती नगर खात रोड भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) पैसे न दिल्याच्या कारणावरुन भांडण करुन गालावर धारदार शस्त्राने मारुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १३/०५/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा रेल्वे क्रॉसींग पांढराबोडी रोड शुक्रवारी येथे उभा असता यातील आरोपीने जखमी फिर्यादीस दारु पिण्यासाठी पैसे मागीतले असता फिर्यादीने पैसे न दिल्याने आरोपीने भांडण करुन रागाचे भरात जखमी फिर्यादीचे डोक्याचे मागचे बाजुला व गालावर धारदार शस्त्राने मारुन गंभिर दुखापत करुन जखमी केल्याने फिर्यादी सागर चंद्रशेखर शहाणे वय ३१ वर्ष, रा. रवीद्रनाथ टागोर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३२६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) दारू पिऊन दारूचे नशेत वाहन धोकादायक रित्या चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १४/०५/२०१७ चे १७.०० ते १७.१५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन धोकादायक रित्या दारूचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने डॉ. रिपोर्ट अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम १८४, १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

६) जळाल्याने औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—

दिनांक १४/०५/२०१७ चे ०८.४० वा दर. यातील मृतक सौ. चंद्रकला संजय खांदाळे वय ३४ वर्ष, रा. दाभा ही दिनांक १७/०४/२०१७ ला दाभा येथे स्वत:चे घरी जळाली त्या मुळे तीला औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक १४/०५/२०१७ ला मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रा वरुन सरतर्फे फिर्यादी पोशि. वैद्य पो.स्टे वरठी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

७) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक १४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. आंधळगाव व साकोली येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०८ लिटर २८० मिली देशी + १ मोटार सायकल किंमती २,८००/रु. चा माल जप्त करण्यात आला आहेत.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०९, तीन सिटर वाहनांवरती १९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.